# आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प

## राज्य मातृसंस्था

## सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिट्युट (स्टापी)

**म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, पहिला मजला, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी,**

**येरवडा, पुणे– ४११००६**

**दुरध्वनी क्र. ०२०– २६६८ ७९०० २६६९६२१२ २६६८४६४१**

**Email.ID- stapipune@gmail.com**

**Website : www.stapi.org**

**कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थ–आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प पार्श्वभूमी:**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत, सार्वजनिक आरोग्य यंत्रणा व स्थानिक स्वयंसेवी संस्था यांचे मदतीने व समन्वयाने, ग्रामीण आरोग्य सेवा पुरविण्याच्या शासनाच्या उद्दिष्टांच्या अनुषगांने आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प (CBMP) महाराष्ट्र राज्यात एकुण १७ जिल्ह्यात कार्यान्वित आहे.

सामाजिक अभिसरणाद्वारे लोकसहभागात चालना व आरोग्य सेवांचे विकेंद्रित नियोजन हे आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्पाचे (CBMP) दोन महत्वाचे घटक आहेत.

कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थ – शासकीय सार्वजनिक आरोग्य सेवा/सुविधा लोकाभिमुख व लोकाधारित होण्याच्या दृष्टीने आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया अधिकाधिक लोकसहभागीय तसेच भविष्यातील वाटचालीसाठी स्वतंत्र परंतू पूरक व नाविन्यपूर्ण रणनीतीचा अवलंब करणारी अशी असावी असे अपेक्षित आहे.

स्थानिक जनतेने शासकीय योजना व सार्वजनिक आरोग्य सेवांची बांधिलकी जबाबदारी व उत्तरदायित्व तसेच नेतृत्व घेणे अभिप्रेत आहे.

सार्वजनिक आरोग्य विषयक आवश्यक सोयी सुविधाचा व संदर्भीय सेवांच्या संबंधित प्रश्नांचा पाठपुरावा करुन सकारात्मक दृष्टीकोनातून व लोकसहभागातून ग्रामीण भागातील जनतेला दर्जेदार विश्वासार्ह तसेच सहज उपलब्ध होणारी व परवडणारी अशी आरोग्यसेवा उपलब्ध होऊन एक निकोप आणि निरोगी आरोग्यदायी समाज निर्माण होण्यासाठी ह्या प्रकल्पाची मोलाची मदत होईल.

राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई अंतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प राबविण्यासाठी अहमदनगर रायगड चंद्रपूर गडचिरोली, ठाणे, पालघर, नाशिक व नंदूरबार ह्या आठ जिल्ह्यांत **'जिल्हा मातृसंस्था'** निवडीसाठी नोंदणीकृत सामाजिक स्वयंसेवी संस्थांकडून शनिवार दिनांक १२/१२/२०२० पर्यंत किंवा पूर्वी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

प्रकल्पाची सविस्तर माहिती, संस्था निवडीचे निकष व प्रस्ताव सादरीकरणाचा विहित नमुना सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिट्युट या राज्य मातृसंस्थेच्या **www.stapi.org** ह्या संकेत स्थळावर उपलब्ध असून संस्थेच्या संकेत स्थळावरील link वर विहित नमुन्यातील प्रस्ताव शनिवार दिनांक १२/१२/२०२० सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत किंवा पूर्वी PDF स्वरुपात upload करावेत.

अंतिम तारखेनंतर पाठविलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी. संस्था निवडीचे सर्व अधिकार राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई आणि सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिट्युट (स्टापी),ह्यांचेकडे राखीव आहेत.

प्रस्ताव सादर करण्यास काही अडचणी येत असल्यास स्टापी कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांकावर ०२० – २६६९६२१२ /२६६८७९०० श्री. निलेश जोशी ह्यांच्याशी संर्पक साधावा.

आपल्या संस्थेच्या प्राप्त प्रस्तावाच्या छाननीच्या आधारे व आपल्या संस्थेचा प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३ दिवसामध्ये आपणास पुढील सुचना निर्गमित करण्यात येतील ह्याची कृपया नोंद घ्यावी.

## कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थ – आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प
## जिल्हा मातृसंस्था निवडीचे निकष

१) नोंदणीकृत सामाजिक संस्था म्हणून किमान सामाजिक क्षेत्रातील १० वर्षे कामाचा संस्थेचा अनुभव आवश्यक

२) ग्रामीण तसेच अतिदुर्गम भौगोलिक कार्यक्षेत्रात सार्वजनिक आरोग्य व इतर सामाजिक क्षेत्रात काम करण्याची संस्थांची तयारी व मानसिकता आवश्यक

३) आरोग्य सेवांचे सामाजिक उत्तरदायित्व वाढविणे/ लोकांकडून हमीच्या आरोग्य सेवासुविधा व संदर्भीय सेवा पुरविणाऱ्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणांशी सहभाग व समन्वयाने हमीच्या आरोग्य सेवाबददलची मागणी बळकट करणे, आरोग्य हक्कासाठी कर्तव्ये जबाबदाऱ्या व उत्तरदायित्व ह्यासाठी स्थानिक जनतेला सक्रिय करणे
ग्रामीण भागात आरोग्यावर आधारित उपक्रम राबविण्याचा /काम केल्याचा किमान **१०** वर्षाचा अनुभव आवश्यक

४) ग्रामीण भागात आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या किमान १० संस्था / संघटनासोबत लोकसहभागीय सहयोगी पध्दतीने विविध सामाजिक प्रकल्प हाताळणीत लक्ष्य पूर्ण केल्याचा अनुभव आवश्यक (Networking) जनसंपर्काच्या माध्यमातून किमान ५ वर्ष काम केल्याचा अनुभव आवश्यक

५) जिल्हा आणि तालुका स्तरावरील सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणाबरोबरच इतर शासकीय निमशासकीय संस्था/यंत्रणा /घटकाबरोबर काम करण्याचा अनुभव आवश्यक

६) प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेची मागील ५ वर्षात प्रतीवर्ष किमान रु. १ कोटी क्षमतेची उलाढाल व तेवढीच स्थिर मालमत्ता व संस्थेचे कार्यालय असणे बंधनकारक आहे.

७) मागील ५ वर्षाचे आर्थिक लेखापरिक्षण अहवालात सनदी लेखापाल याचा समाधानकारक शेरा असावा

८) प्रशिक्षणे, कार्यशाळा, साहित्ये प्रकाशने, आरोग्य क्षेत्रात विविध अभ्यास संशोधन तथा माहिती संकलन व विश्लेषण यात सलग ५ ते ७ वर्ष अनुभव आवश्यक

९) लोकाभिमुख व लोकसहभागातून सार्वजनिक आरोग्य सेवा अनुषगांने विविध क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजन, लोकाधारित व लोकसहभागातून लोकसमूह /लोकसंघटन संवर्धन सक्षमीकरण बळकटीकरणाचा अनुभव आवश्यक

१०) सार्वजनिक आरोग्य व इतर सामाजिक क्षेत्रात काम केल्याचा प्रशिक्षण कार्यशाळा आयोजनाचा किमान पाच वर्षे अनुभव असलेला पूर्णवेळ उपलब्ध असलेला अनुभवी कर्मचारी वृंद अनिवार्य व आवश्यक

११) संस्था Black Listed नसावी. ह्या संदर्भातील संस्था पदाधिकाऱ्यांचे लेखी प्रमाणपत्र आवश्यक व बंधनकारक

१२) अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व अहमदनगर तालुका ; चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर व जिवती तालुका ; गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली, कुरखेडा व आरमोरी तालुका ; ठाणे जिल्ह्यातील मरबाड व शहापूर तालुका ; रायगड जिल्ह्यातील कर्जत व सुधागड तालुका ; पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जवाहर व डहाणू तालुका; नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर व इगतपूरी तालुका ; नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार व धडगाव तालुका ह्या तालुक्यामध्ये सार्वजनिक आरोग्य व संबधित सामाजिक क्षेत्रात काम केल्याचा संस्थेचा ३ ते ५ वर्षांचा अनुभव